Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- XI | ISSUE- VII | JULY | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय विषयांची भूमिका आणि आव्हाने

**प्रा. अनभूले प्रविण आनंद**
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.

संपूर्ण जगाला बदलण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. शिक्षणाचे सामर्थ्य ओळखून समाज व्यवस्थेत योग्य बदल घडून आणण्यासाठी शिक्षण या माध्यमाला अन्ययसाधारण महत्व राहिले आहे.ब्रिटिश राजवटीत कारकून निर्माण करणारी शिक्षण पद्धती अस्तित्वात होती. परंतु खऱ्या अर्थाने भारतात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय शिक्षण पद्धतीत बदल घडवण्याच्या दृष्टीने अनेक सुधारणा करण्यात आल्या. विविध बाजूंनी सुधारणा घडवून आणण्यासाठी विचार मांडण्यात आले. विविध समित्या मार्फत विविध शिफारशी करण्यात आल्या . परंतु शिक्षण पद्धतीत बदल घडून आणण्यात म्हणावे तेवढी यश संपादन करता आले नाही. यात प्रामुख्याने भारतीय शिक्षण प्रणालीतील कालबाह्य अभ्यासक्रम, प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव, झपाट्याने होणारा सामाजिक आणि आर्थिक बदल, तांत्रिक प्रगती आणि जागतिकीकरणाचा प्रभाव,आंतरराष्ट्रीय क्रमवारीमध्ये भारताचे निम्न स्थान, दर्जेदार शिक्षणाच्या प्रवेशातील विषमता, कौशल्य विकासाचा अभाव, शिक्षणातील वाढते गळतीचे प्रमाण, सुजाण नागरिकांकडून येणारा व्यापक सल्ला आणि अभिप्राय इत्यादी बाबींचा विचार करून भारताच्या शिक्षण प्रणालीमध्ये परिवर्तन घडवून आणण्यात आले. याच धरतीवर नवीन शैक्षणिक धोरण 2020 लागू करण्यात आले आहे. 1984 च्या नंतर 34 वर्षांनी नवीन शैक्षणिक धोरण आले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 हे ज्येष्ठ वैज्ञानिक डी. के. कस्तुरीनंदन यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आले आहे. या धोरणात सर्वांना समान शिक्षण, समानता, गुणवत्ता, परवडणारे शिक्षण आणि उत्तरदायित्व या पाच स्तंभाचा विचार करून तयार केले गेले आहे.ज्यात प्रामुख्याने नवीन शैक्षणिक धोरण अधिक समावेशक आणि लवचिक कसे राहील, तसेच ज्ञानी, कुशल आणि सहानुभूतीशील व्यक्ती विकसित करण्यावर केंद्रित आहे. अत्यंत व्यापक दृष्टिकोन ठेवून नवीन शैक्षणिक धोरण राबवले गेले आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय विषयावर भर देण्यात आला आहे. बहुविद्याशाखीय शिक्षण हा नव्या शैक्षणिक धोरणाचा कणा आहे. बहुविद्याशाखीय शिक्षणात अनेक विषय किंवा अभ्यासाच्या क्षेत्रामधील सामग्री आणि शिकण्याच्या पद्धतींना एकत्रित करतो. बहुविद्याशाखिय कार्यक्रमात विद्यार्थ्यांना एकाच विषयावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी विविध विषयाच्या क्षेत्रातील दृष्टिकोन आणि कार्यपद्धती यांच्या परिचय दिला जातो. बहुविद्याशाखीय शिक्षण ही संकल्पना ही नवीन नसून ती प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेली पाहायला मिळते. या नव्या शैक्षणिक धोरणातील अम्ब्रेला ऑर्गनायझेशन संकल्पना सुद्धा बहुविद्याशाखीय विषयांना एकच ठिकाणी एकत्र आणण्यासाठी मांडली गेली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय विषयाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. या दृष्टीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय विषयाची भूमिका समजावून आवश्यक ठरते.

## सर्वसामावेशक आणि सर्वांगीण शिक्षण

नवीन शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय विषय हे सर्वसामावेशक शिक्षण प्रदान करण्यास मदत करते. ज्यात अनेक विषयांना एकत्रित करून अध्ययन केले जाते. ज्यामुळे जटिल समस्यांचे सखोल अध्ययन करता येते. ज्यामुळे गंभीर समस्यांचे सखोल आणि सहज आकलन होते. समकालीन प्रश्नांचे आकलन करता येते. बहुविद्याशाखीय कार्यक्रमामुळे विषय किंवा समस्येबद्दल अधिक व्यापक समज प्रदान होते.

**लवचिकता आणि निवड**

नवीन शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखिय विषय हे विद्यार्थ्यांना विषय निवडण्यासाठी मुभा देते. विविध विषयातील ज्ञान, दृष्टिकोन, कार्यपद्धतींचे स्पष्टीकरण देते. विविध ज्ञान शाखेतील विषयांचे ज्ञान घेण्यासाठी लवचिकता प्रदान करते. जसे की कला आणि विज्ञान यांच्यातील ठळक विभागणी अंधुक करते . विविध ज्ञान शाखेतील अंतर कमी करते. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार आणि करिअरच्या उद्दिष्टानुसार विविध विषयातील अभ्यासक्रम निवडून शिक्षण घेता येते.

**कौशल्य विकास**

बहुविद्याशाखीय विषय आवश्यक कौशल्य विकसित करण्यास मदत करतात. जसे की संवादाचे कौशल्य, परस्परात सहयोगाचे कौशल्य आणि जटिल स्वरूपाच्या समस्येवर सर्व अंगांनी गंभीर विचार करण्याचे कौशल्य विकसित करण्यात बहुविद्याशाखीय विषय हे मदत करतात. जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये अंतरविद्याशाखीय skills अवगत होतात.विद्यार्थ्या मध्ये व्यावसायिक कौशल्य निर्माण होतात. कौशल्य विकास विद्यार्थ्यांची कार्यशक्तीत वाढवण्यासाठी तयार करते.

**नवीनता आणि उद्योजकता**

बहुविद्याशाखीय विषय विविध विषयाची सांगड घालून विद्यार्थी नाविन्यपूर्ण उपाययोजना करू शकतात. उद्योजकीय कल्पना विकसित करू शकतात. आर्थिक विकासासाठी ते सृजनशीलता आणि गतिशीलता वाढू शकतात.

**अंतरविद्याशाखीय शिक्षण**

अंतरविद्याशाखीय शिक्षणात अनेक विषयाचे एकत्रीकरण केले जाते. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मध्ये विविध प्रकारचे कौशल्य विकसित होतात. विद्यार्थी पद्धतशीरपणे सहसंबंध विकसित करतात. ते गतिशील, गंभीर विचारांना प्रोत्साहन देतात आणि ते समस्यांचे निराकरण करतात.

परस्पर संबंधित शिक्षण बहुविद्याशाखीय पद्धतीतील interconnected learning च्या वैशिष्ट्यामुळे विद्यार्थी विविध दृष्टिकोन आणि कार्यपद्धती मध्ये व्यस्त राहतात. विषयाच्या अधिक समग्र आणि परस्पर संबंधित दृष्टिकोनाला प्रोत्साहन देतात.

**सहयोगी शिक्षण** (Collaborative Learning)

बहुविद्याशाखिय शिक्षण विद्यार्थ्यांनी शिक्षक यांच्या सहकार्याला प्रोत्साहन देतात. हे सहयोगी वातावरण विचाराची देवाणघेवाण आणि विस्तृत कौशल्य संपादनाच्या विकासाला प्रोत्साहन देतात.

बहुविद्याशाखीय विषयामुळे ज्ञानाची क्षितिजी विस्तृत होतात. ज्ञानाच्या संचयात वाढ होते स्वभोवतालच्या घटनांचे व्यवस्थित आकलन होते. एकाच वेळी विशिष्ट आणि अनिर्बंध शिक्षणाला चालना मिळते. अनेक विषयात संशोधन करण्याची संधी उपलब्ध होते. विविध प्रकारचे करियर करण्यासाठी बहुविद्याशाखीय विषयाची भूमिका महत्वपूर्ण ठरते. असे असले तरी नवीन शैक्षणिक धोरणातील बहुविद्याशाखीय विषयांपुढे नवीन आव्हाने उभी आहेत. यात प्रामुख्याने विद्यमान अभ्यासक्रम आणि शिकवण्याच्या पद्धतीत अंतरविद्याशाखीय विषयाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे मोठे आव्हान राहणार आहे. अंतरविद्याशाखीय विषय शिकवण्याची कौशल्य आणि ज्ञानाने संपन्न राहण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षित करून त्यांच्यात क्षमता निर्माण करण्याचे आव्हान राहणार आहे. याशिवाय अंतरविद्याशाखीय विषयासाठी सर्वसामावेशक अभ्यासक्रमाची रचना तयार करणे, ती विकसित करणे, अंतरविद्याशाखीय शिक्षणाला सामावून घेणाऱ्या मूल्यांकन पद्धती विकसित करणे, अंतरविद्याशाखीय शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी पुरेशी संसाधने, पायाभूत सुविधा आणि वित्त पुरवठा करणे, विद्यार्थी आणि पालक यांनी यांमध्ये आंतरविद्याशाखीय विषयाची जागरूकता वाढवून त्यांची स्वीकृती मिळवणे, बहुविद्याशाखीय शिक्षण व्यावसायिक पातळीवर राबवण्यासाठी आणि प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी उद्योग समुदाय आणि संस्था सोबत सहकार्य वाढवण्याचे, विशिष्ट आणि आंतरविद्याशाखीय ज्ञानात संतुलन निर्माण करणे, नवीन शैक्षणिक धोरणातील शिक्षणाचे परिणाम साध्य करण्यासाठी किंबहुना आंतरविद्याशाखीय परिणाम दिसून येण्यासाठी त्याचे नियमित मूल्यमापन व परीक्षण करण्याचे, या व यासारख्या अनेक आव्हानांना तोंड देऊन भारत नवीन शैक्षणिक धोरणात आंतर विषयाची यशस्वी अंमलबजावणी करू शकतो आणि विद्यार्थ्यांना सर्वसामावेशक भविष्यवादी आणि सर्वांगीण शिक्षण देऊ शकतो अशी अपेक्षा करूया.

**संदर्भः**

1. एरंडे व्ही. एल. 2017, उच्च शिक्षणातील बदल : वास्तव आणि अपेक्षा, पुणे. हर्मिस प्रकाशन.
2. मोरे डी. एन. 2023, उच्च शिक्षण धोरण आव्हाने आणि दिशा, पुणे. द युनिक अकॅडमी पब्लिकेशन.
3. थोरात सुखदेव अनुवाद: वलसे राजक्रांती, तेगमपुरे मारुती, 2022, नवीन शैक्षणिक धोरण 2020, पुणे. हरिती पब्लिकेशन.
4. https//www. dailyexcelsior.gov.in
5. https//www. Education.gov.in
6. https//www.mahamtb.gov.in